महाराष्ट्र लोकसेवा आयोग

Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


क्रमांक : २१७५/निर्लेखित वाहने/पाच-अ दिनांक: ३१ ऑगस्ट, २०१९

## निविदा सूचना क्रमांक : 07/2019

सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, $5^{1/2}$, 7 व 8 वा मजला, महानगर टेलिफोन निगम लिमिटेड, कुपरेज इमारत, महर्षि कर्वे मार्ग, मुंबई 400 021 यांचे कार्यालयातील जुन्या वाहनाच्या विक्रीकरिता मोहोरबंद निविदा मागवित आहेत. सदरच्या वाहनाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वाहन नोंदणी क्रमांक | वाहनाचा प्रकार | किमान मुल्य (हातची किंमत रुपयांत) | अनामत रक्कम (रुपयांत) |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | MH-01-ZA-5005 | होंडा सिटी | 85,681/- | 5,000/- |

सदर निविदा दिनांक 11 सप्टेंबर, 2019 रोजी संध्याकाळी 5.00 वाजेपर्यंत पोहोचतील अशा पद्धतीने मोहोरबंद पाकीटात पाठवाव्यात. विहित वेळेत प्राप्त निविदा दिनांक 17 सप्टेंबर, 2019 रोजी दुपारी 3.00 वाजता उघडण्यात येतील. निविदा उघडतेवेळी निविदाधारकास उपस्थित राहण्यास परवानगी आहे.

कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्विकारण्याचे वा नाकारण्याचे अधिकार सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांचेकडे राखून ठेवले आहेत, याची कृपया नोंद घ्यावी.

## निविदा संदर्भात नियम व अटी

| अ.क्र. | नियम व अटी |
|---|---|
| 1 | मोहोरबंद पाकीटात निविदा समक्ष दिनांक 01 सप्टेंबर ते 11 सप्टेंबर, 2019 या कालावधीत सकाळी 11.00 ते सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, $5^{1/2}$वा मजला, महानगर टेलिफोन निगम लिमिटेड, कुपरेज इमारत, महर्षि कर्वे मार्ग, मुंबई 400 021 येथे सादर करावी. त्यावर "वाहन क्रमांक MH-01-ZA-5005 (होंडा सिटी) या वाहनाच्या खरेदीसाठी निविदा" असा स्पष्ट उल्लेख असावा. |
| 2 | "जशा आहेत तशा स्थितीत" विक्रीकरिता असलेले क्रमांक MH-01-ZA-5005 (होंडा सिटी) हे वाहन तपासणीसाठी मुंबई येथील महर्षी कर्वे रोडवरील निलांबरी या शासकीय इमारतीच्या आवारामध्ये ठेवण्यात आले आहे. |
| 3 | ज्यांना रजिस्टर पोस्टाने निविदा पाठवावयाची आहे, त्यांनी निविदा कोणत्याही परिस्थितीत दिनांक 11 सप्टेंबर, 2019 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत या कार्यालयास कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत प्राप्त होईल याची दक्षता घ्यावी. अथवा वरील कालावधीत |

| | |
|---|---|
| | समक्ष सादर करावी. निविदेसोबत कोणतेही एक ओळखपत्र जोडणे आवश्यक आहे. |
| 4 | इसा-याची रक्कम रु. 5,000/- (प्रत्येक निविदेस) लेखा अधिकारी, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया, फोर्ट, मुंबई 400 001 यांच्याकडे जमा करावी. |
| 5 | इसा-याची रक्कम भरल्यानंतर लेखा अधिकारी, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्याकडून प्राप्त झालेली पावती, निविदा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. इसा-याची रक्कम भरल्याबाबतचा पुरावा सोबत सादर केलेला नसल्यास निविदा ग्राह्य धरली जाणार नाही. |
| 6 | निविदा उघडण्याच्या वेळी निविदाधारक किंवा अधिकृत प्रतिनिधी यांना हजर राहता येईल. |
| 7 | यशस्वी निविदाधारकास निविदा सफल झाल्याचे कळल्यापासून रोख रक्कम भरुन एक आठवडयात वाहनाचा प्रत्यक्ष ताबा घेणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची निविदा रद्दबातल ठरविली जाईल व इसा-याच्या रक्कमेस त्यास मुकावे लागेल. |
| 8 | वस्तु व सेवाकर अधिनियमानुसार, यशस्वी निविदाधारकास आवश्यक तो वस्तु व सेवा कर (GST) भरावा लागेल. तसेच वस्तु व सेवा कर (GST) भरल्याचा पुरावा शासनास सादर करावा लागेल. |
| 9 | यशस्वी निविदाधारकास नियम व अटीनुसार करार पूर्ण करु शकत नसल्याचे दिसून आल्यास त्याने भरलेल्या इसा-याची रक्कम जप्त करण्यात येईल. |
| 10 | दरामध्ये तसेच निविदा कागदपत्रात कोठेही खाडाखोड, Overwriting, पांढरी शाई लावणे टाळावे.चुकून तसेच करावे लागल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी. तसे न केल्यास निविदा रद्द करण्याचे अधिकार आयोगाने राखून ठेवले आहेत. |
| 11 | कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा अधिकार सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, $5^{1/2}$, 7 व 8 वा मजला, महानगर टेलिफोन निगम लिमिटेड, कुपरेज इमारत, महर्षि कर्वे मार्ग, मुंबई 400 021 यांना राहतील. |
| 12 | शासकीय वाहन क्रमांक MH-01-ZA-5005 (होंडा सिटी) च्या हस्तांतरण नोंदणीबाबत सर्व प्रक्रिया यशस्वी निविदाधारकास स्वखर्चाने करावी लागेल. |
| 13 | सदर वाहन जेथे आहे व जशी आहे तशी या तत्वावर विक्री करावयाची आहेत. बोलीधारकाने नमूद केलेल्या ठिकाणी निरुपयोगी वाहनाची प्रत्यक्ष पाहणी करुन जास्तीत जास्त दर नमूद करावे. नंतर तक्रार ऐकून घेतली जाणार नाही. सदर वाहन लिलावाच्या दिनांकापूर्वी पाहण्यास उपलब्ध राहतील. |
| 14 | ज्या लिलाव निविदा रक्कम रुपये निर्धारीत हातची किंमतीपेक्षा जास्तीत जास्त असेल तीच निविदा स्वीकृतीस पात्र राहील. |
| 15 | लिलाव संबंधित काही तांत्रिक अडचणी आल्यास कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक 022-22795910/36/89 यांचेशी संपर्क साधावा. |

ठिकाण : मुंबई
दिनांक : 31 ऑगस्ट, 2019

सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
मुंबई

| | निविदा क्रमांक | |
|---|---|---|
| 1 | निविदाधारकाचे नांव | |
| 2 | निविदाधारकाचा संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक | |
| 3 | निविदाधारक कंपनी असेल तर कंपनीचा संपूर्ण पत्ता व दुरध्वनी क्रमांक | |
| 4 | वस्तु व सेवा कर (GST) नोंदणी क्रमांक | |
| 5 | इसा-याची रक्कम भरलेली पावती क्रमांक व दिनांक | |
| 6 | निविदा सादर करावयाचा दिनांक | दिनांक 11 सप्टेंबर, 2019 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत |
| 7 | निविदा उघडण्याचा दिनांक | दिनांक 17 सप्टेंबर, 2019 रोजी दुपारी 3.00 वाजता |

प्रति,

सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
$5^{1/2}$, 7 व 8 वा मजला,
महानगर टेलिफोन निगम लिमिटेड,कुपरेज इमारत,
महर्षि कर्वे मार्ग, मुंबई 400 021

विषय :शासकीय वाहन क्रमांक MH-01-ZA-5005 (होंडा सिटी) च्या खरेदीबाबत.

महोदय,

आपली निविदा सूचना क्रमांक : 07/2019 च्या संदर्भात सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, $5^{1/2}$, 7 व 8 वा मजला, महानगर टेलिफोन निगम लिमिटेड,कुपरेज इमारत,महर्षि कर्वे मार्ग, मुंबई 400 021 यांनी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या आणि निविदा नमुन्यासोबत जोडलेल्या नियम व अटीनुसार मी/आम्ही वाहन क्रमांक MH-01-ZA-5005 (होंडा सिटी) हे रुपये /- (अक्षरी रुपये फक्त) एवढी किंमत देऊन खरेदी करु इच्छितो.

मी/आम्ही निविदेबाबतच्या सर्व नियम व अटी मान्य करतो.

आपला विश्वासू,

( निविदाधारकाची स्वाक्षरी )
संपूर्ण पत्ता व दुरध्वनी क्रमांक

**टिप :**कंपनीच्या वतीने वाहन खरेदी केल्यास कंपनीचा संपूर्ण पत्ता व दुरध्वनी क्रमांक प्रामुख्याने देण्यात यावा.